Estd : 1962
'A'' *Accredited by* NAAC (2021)
with CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
६३ वा दीक्षांत समारंभ
विद्यार्थ्यांसाठीची अधिसूचना

१) विद्यापीठाचा ६३ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहूउद्देशिय सभागृहात शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष मा. श्री. जिष्णु देव वर्मा, राज्यपाल महाराष्ट्र राज्य व कुलपती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. जनरल जे.जे.सिंग, प.वि.से.प., अ.वि.से.प., वि.से.प. (से.नि.) माजी राज्यपाल अरुणाचल प्रदेश, भारतीय लष्कराचे माजी लष्करप्रमुख, द मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटचे मानद कर्नल, हे उपस्थित राहणार आहेत. तसेच नामदार मा.चंद्रकांतदादा पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

२) दीक्षांत समारंभासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आवाहनानुसार व विद्यापीठ अधिकार मंडळाने निश्चित केल्याप्रमाणे पांढऱ्या रंगाचा शर्ट (पुरुषांसाठी) तर पांढऱ्या/मोती रंगाची जरीची साडी किंवा सलवार कुर्ता (महिलांसाठी) असा पोषाख परिधान करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

३) विद्यापीठ परिसरात विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी फोटो काढत असताना फक्त विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या मानवस्त्राचा वापर करुन फोटो काढावेत. अन्य कोणत्याही प्रकारचे गाऊन व टोपीचा वापर करु नये.

४) दीक्षांत समारंभासाठी विदयार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मानवस्त्राची परतावा अनामत रक्कम रु. ६५०/- आणि भाडे ना परतावा रु.२५/- आकारण्यात येणार आहे.

५) ज्या विद्यार्थ्यांनी टपालाव्दारे (By Post) पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा विकल्प अर्ज भरताना निवडला आहे. त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ संपन्न झालेवर अर्जावरील पत्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.

६) सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालयांतील ज्या विद्यार्थ्यांनी, अर्ज भरताना In person असा विकल्प निवडला आहे. अशा स्नातकांची पदवीप्रमाणपत्रे, विद्यापीठामध्ये दीक्षांत समारंभा दिवशी सकाळी ७:३० ते ११:०० या वेळेत आणि समारंभ संपल्यानंतर सायंकाळी ५:३० वाजेपर्यत विद्यापीठामध्ये परीक्षा भवन क्रं.२ या ठिकाणी वितरण व्यवस्थेव्दारे वितरीत केली जातील. (स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारताना शासकीय ओळखपत्र (आधारकार्ड/ पॅनकार्ड/मतदान ओळखपत्र इ. यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्रे प्राप्त करावीत.) तसेच ज्या विदयार्थ्यांनी In person असा विकल्प निवडला असूनही दीक्षांत समारंभादिवशी पदवी प्रमाणपत्रे स्विकारलेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी दि.१/१२/२०२६ ते ३१/१२/२०२६ अखेर पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत विभागातुन कार्यालयीन वेळेत स्विकारावीत.

७) ६३ व्या दीक्षांत समारंभासाठीच्या व्यासपीठावर देण्यात येणाऱ्या, पीएच.डी. व पारितोषिक प्राप्त स्नातकांची यादी व पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/63convocation) या सदरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

८) पदवीप्रमाणपत्र क्रमांक माहितीसाठी विद्यापीठ संकेत स्थळावर दिलेल्या लिंकचा व दिलेल्या क्युआर कोडचा वापर करावा. link---https://studentapps.unishivaji.ac.in/findbooth/

दीक्षांत विभाग
दि. २५/११/२०२६

डॉ. अजितसिंह एन. जाधव
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ